पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९८०** **दि. १३/०९/२०१९**

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

## मिसींग मुलीस समर्थ पोलीसांनी शोधून केले पालकांच्या हवाली.

समर्थ पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रातील मंजुळाबाई चाळ या एसआरए प्रकल्पातील रहिवासी असलेले कुटुंबातील एकुलती एक मुलगी ही दिनांक ३/९/२०१९ रोजी सकाळी ९-४५ वा. चे सुमारास रहाते घरातून अचानकपणे निघून गेली होती. ती मिसींग झाल्याने तिचे पालकांनी समर्थ पोलीस ठाण्यात मिसींग तक्रार नोंद केलेली होती. समर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक श्री. प्रदीप पालांडे , पोशि. चंद्रकांत खरात ,पोशि. नलावडे यांनी मुलींचे रहाते घरी व परिसरात तिचे बाबत कसून तपास केला . परंतु काहीच धागादोरा पोलीसांना मिळत नव्हता.

दिनांक ११/९/२०१९ रोजी पो.शि. चंद्रकांत खरात यांना मिसींग मुलगी ही श्रीरामपूर येथे त्यांचेच परिसरातील एका मुलासमवेत असल्याची खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली. त्यांनी पोलीस उप निरीक्षक प्रदीप पालांडे यांना माहिती दिली . यानंतर मा.श्री. प्रदीप आफळे , सहायक पोलीस आयुक्त , फरासखाना विभाग, पुणे आणि श्री. बाळकृष्ण कदम , वरिष्ठ पोलीस निरीक्षक , समर्थ पोलीस ठाणे पुणे यांना त्यांची माहिती देण्यात आली . त्यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक पालांडे , खरात व नलावडे यांनी मिळालेले बातमीनुसार श्रीरामपूर येथे जाऊन मिसींग मुलीस अहमदनगर बसस्टॉप मागील बाजूस येथून तिचा मित्र असलेले मुलासमवेत ताब्यात घेऊन समर्थ पोलीस ठाणे पुणे येथे आणून तिचेकडे व तिच्या मित्राकडे कसून चौकशी केली. तेव्हा मुलगी घरातील पालक हे सारखे रागावतात व त्रास देतात म्हणून त्यांचेवर पालकांवर रागावून आपले मित्रासमवेत स्वतःचे मर्जीने निघून गेलेली होती. अशी माहिती त्यांनी दिली . मुलीचे पालक , मुलगी यांनी देखील तिचे मित्राचा यामध्य कही दोष नाही असे सांगितल्याने मुलीस तिचे पालकांचे ताब्यात देण्यात आले. मुलीचे पालकांना देखील पोलीस उप निरीक्षक पालांडे यांनी मनमोकळे पणाने बोलून तिला तिच्या भावना व्यक्त करु दया, यामधून तिच्या आशा आकांशा याची माहिती मिळून तिचेकडून असे कृत्य होणार नाही याबाबत समुपदेशन केले .